# वसई-विरार शहर महानगरपालिका
## पाणीपुरवठा विभाग

---

दि.१७/०५/२०२१

**प्रेसनोट**

**जाहीर सूचना**

वसई विरार शहर महानगरपालिकेस सूर्या, उसगांव आणि पेल्हार या पाणीपुरवठा योजनांमधून पाणीपुरवठा होत आहे. 'तौक्ते' चक्रीवादळामुळे संपूर्ण पालघर जिल्ह्यात अतिवृष्टी व वादळी वारे सुरु आहेत. चक्रीवादळामुळे विजेच्या तारा तुटून, विजेचे खांब पडून पाणीपुरवठा योजनांच्या पंपिंग स्टेशन व जलशुद्धीकरण केंद्रास होणारा वीजपुरवठा खंडीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वीजपुरवठा खंडीत झाल्यास विद्युत पंप बंद पडून त्याचा परिणाम शहरातील पाणी पुरवठ्यावर होऊन २ ते ३ दिवस पाणीपुरवठा खंडीत होण्याची शक्यता आहे.

तरी नागरिकांनी उपलब्ध असलेले पाणी जपून वापरावे व महानगरपालिकेला सहकार्य करावे.

पाणीपुरवठा विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका